मिळकतीवर लिहून देणार यांनी बांधकाम सुरु केलेल्या इमारतीतील बांधीव क्षेत्रांची विक्री करण्याचा अधिकार वरील नमुद केल्याप्रमाणे दिनांक 21/08/2018 रोजी नोंदविलेल्या खरेदीखतानुसार मालक या नात्याने मिळालेले आहे. त्या अनुषंगाने सदर इमारतीतील बांधीव भागांची विक्री लिहून देणार यांना करावयाची असुन लिहून घेणार यांना देखील सदर भागातच राहण्यासाठी फ्लॅट मिळकतीची आवश्यकता असल्याने लिहून घेणार यांना लिहून देणार यांचे इमारतीचे बांधकामाची माहीती झाली व त्यांनी लिहून देणार यांना मिळालेल्या मालकी हक्कांबद्दलची, मिळालेल्या परवानग्यांची व सर्व कागदपत्रांची पाहणी करुन स्वतःची खात्री झालेनंतर आपसात बोलणी करुन अटी व शर्ती ठरवून कलम 2 मध्ये वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्याचे ठरवून त्यानुसार प्रस्तुतचा करारनामा लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभांत खालील अटी व शर्तींवर आजरोजी लिहून व नोंदवून देत आहे.

-:अटी व शर्ती:-

1) **मिळकतीची किंमत:-** वर कलम 2 मध्ये वर्णन केलेली फ्लॅट/सदनिका मिळकत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना एकुण किंमत **रक्कम रुपये** ...../- **(अक्षरी रुपये** ..... **मात्र)** या एकुण किंमतीस खरेदी देतील. सदर किंमत ही लिहून घेणार व लिहून देणार यांचे संमतीने व समाधानाने ठरलेली असुन त्यास लिहून देणार यांची कुठलीही हरकत अगर तक्रार नाही. सदर किंमत ही परिशिष्ठात नमुद केलेल्या सुविधांसह ठरलेली आहे.

2) **किंमतीचा भरणा:-** वर कलम 2 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या किंमतीचा भरणा हा लिहून घेणार यांनी मिळकतीचे क्षेत्राचे मोजमाप करुन घेवून किंमत ठरविलेली आहे. तसेच क्षेत्रावावत उभयतांमध्ये कोणताही वाद अगर तक्रार नाही. लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालील दर्शविल्याप्रमाणे किंमतीचा भरणा द्यावयाचा आहे.

भरण्याचे प्रमाण	तपशिल
50%	आरसीसी काम 50% पुर्ण झाल्यानंतर
15%	विट बांधकाम 50% पुर्ण झाल्यानंतर
10%	विट बांधकाम 100% पुर्ण झाल्यानंतर

10%	प्लास्टरचे काम सुरु केल्यानंतर
10%	फ्लोअरींग चे काम सुरु केल्यानंतर
5%	कब्जा देते वेळी
100%	मिळकतीचे एकुण किंमतीचा संपूर्ण मोबदला.

आजपायेतो लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालीलप्रमाणे भरणा दिलेला/द्यावयाचा आहे. सदरचा भरणा लिहून देणार यांना पावला आहे.

रक्कम	तपशिल
रु. ...../-	अक्षरी रक्कम रुपये ..... मात्र भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिनांक ..... रोजी NEFT अन्वये त्यांच्या बँक खात्यावर अदा केलेला आहे.
रु. ...../-	अक्षरी रक्कम रुपये ..... मात्र लिहून घेणार हे लिहून देणार यांना वित्तीय संस्थेकडुन अगर बँकेकडुन कर्ज प्रकरण करुन वर नमुद केल्याप्रमाणे द्यावयाचे आहे ही बाब उभयतांना मान्य व कबुल आहे.

.....

रु. ...../- एकुण अक्षरी रुपये ..... मात्र.

.....

मिळकतीचा वरील उर्वरित भरणा हा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना ठरलेल्या तारखेस/मुदतीत न चुकता द्यावयाचा आहे. लिहून घेणार यांनी उर्वरित भरणा ठरल्याप्रमाणे न दिल्यास विलंबीत कालावधीकरीता सदर रकमेवर कायद्यानुसार ठरलेले व्याज आकारण्याचा अगर करारनामा रद्द करण्याचा संपूर्ण हक्क लिहून देणार यांनी राखून ठेवलेला आहे. यदाकदाचित करारनामा रद्द केल्यास अन्य खरेदीदारास सदर मिळकत विक्री केल्यानंतर लिहून देणार यांनी त्यांना सदर रक्कम विनव्याजी परत करण्यात येईल. तसेच लिहून घेणार यांना सदरचा करारनामा रद्द करावयाचा असल्यास त्यांनी 15 दिवस पुर्व लेखी नोटीस लिहून देणार यांना द्यावी

Scanned by CamScanner